**पुस्तक ओळख**

# विठाबाईंची चरित्रकविता

## दा. गो. काळे



लेखक शेगाव (जि. बुलडाणा) येथून प्रसिद्ध होणाऱ्या अतिरिक्त या वाङमयीन नियतकालिकाचे कर्तेधर्ते आहेत.

ईमेल– dgkale.atirikta@gmail.com

आजच्या अनुचित श्रेयवादाच्या काळात आपली कळा आणि कला बिजांची भान राखणाऱ्या कवितेत महादेव गोरख कांबळे यांचा प्रयोग महत्त्वाचा आहे. ही कविता विठाबाई भाऊ मांग– नारायणगावकर या रूपाने येथील स्त्री जाणिवेचा इतिहास मांडते. हा खरे तर एका अभिजात कलावंतीणीचा जीवनपट आहे. जी आपल्यासह आपल्यातील कलाधर्माच्या सन्मानासाठी आपल्या दुःखाचा परीघ समस्त स्त्रियांच्या जीवन जाणिवेपर्यंत घेऊन जाते. येथील समाज स्वास्थ वेगवेगळ्या जाती व स्तरांनी प्रभावित झाले असले तरी, पुरुषी मानसिकतेमध्ये स्त्रियांची म्हणून एक वेगळी जात अस्तित्वात आहे. ही गोष्ट नाकारता येत नाही. तिने या वेगवेगळ्या स्तरावर स्वतःला तपासताना आई, बाई व तमासगिर म्हणून आपल्या अस्तित्वाचा व्यापक असा अर्थ स्त्रियांच्या दुःखाशी लावला आणि आपला म्हणून एक स्त्रीवादी दृष्टिकोन या कवितेच्या माध्यमातून समोर ठेवला आहे. कायमचा दुबळेपणा पदरी बांधल्यामुळे व अंगवळणी पडलेल्या सवयीमुळे ही स्त्री बंड करू शकत नाही. तिचे अस्तित्व वेगवेगळ्या बंधनातूनच उमटत राहते. ही करूणा तिच्या व्यक्तिमत्वातून निसटत नाही. तमाशाच्या फडातील बोर्डाजवळील आपले असणे आणि लब्धप्रतिष्ठिताची कलेला समोर जाणारी बेगडी नीतिमत्ता यातील अंतर वेगळे असू शकत नाही. असे असले तरी स्त्रियांच्या दुःखाचा मूलभूत असा दृष्टिकोन विठाबाईच्या विचारांच्या विसंगत जात नाही. त्यांच्याबद्दलचा किंचितही दुःसाह व्यक्तिमत्वातून जाणवत नाही. हा मोठेपणा त्यांच्या चरित्रातून आणि बोलण्यातून वेळोवेळी अनुभवास येताना दिसतो.

मी मात्र नशाबाज/मी रंगेल, मी नखरेल/तुम्ही सगळ्याजणीच म्हटलं तर माझ्यावाणीच वागता/पण तमासगिर नाही/म्हणून कुणाचाही आक्षेप नाही तुमच्यावर/बाईनं बाईला नावं ठेवावीत/असा अर्थ नाही याचा/

महादेव गोरख कांबळे यांनी हा चरित्रात्मक काव्यविषय दोन पातळ्यावर सादर केला आहे. अनुभवाच्या पातळीवर विठाबाई : कारुण्याचे वन आणि दुसऱ्या भागात उपयोजनाच्या भूमिकेतून त्यांना आकळलेली स्त्री केवळ स्त्रीचं अस्तित्व त्यांनी मान्य केलेल आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर विठाबाईचा सर्वस्व नाकारण्याचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. तो नकार वरवरचा नाही. कारण तो तिच्यामध्ये असलेल्या आईपणाच्या निर्मितीक्षम जाणीवेतून आलेला आहे. प्रत्येक बाईच्या मनातील आईपण ही सुंदर आणि जिवंत गोष्ट आहे. त्यापुढे

जगाने उभ्या केलेल्या सगळ्या मान्यता फोल आहेत. तिची अस्मिता पुरुषपणाच्या कसोटीने सिद्ध होत नाही. हा प्रत्यक्ष जगण्यातून आलेला दृष्टिकोन या चरित्रमय कवितेची अत्यंत महत्त्वाची बाजू आहे. कवितेतून एक व्यक्तिमत्व घडत असल्याचा प्रत्यय येतो.

पिढ्यानपिढ्यांच्या बाईपणातून न सुटणाऱ्या अनंत परंपरेतील विठाबाई ही एक प्रतीक आहे. तिला सोसावी लागलेली झळ कोणत्याही काळातील अग्निपरीक्षेपेक्षा कमी नव्हती. नृत्यकलेला सन्मानाचे दिवस येण्याच्या पूर्ण बांधणीचा काळ तिला सोसावा लागला. देहाची पर्वा न करता हिणकस प्रवृत्तीला तोंड देत अभिरुची घडवावी लागली. तरीही तमासगिरांची जात, धर्म आणि कपाळावर बसलेला कमीपणाचा शिक्का सुटला नाही. संस्कृतीच्या ठेकेदारांनी या जगण्याची कला होऊ दिली नाही. या कलावंताच्या आयुष्यात नरक शोधण्याचे वास्तवच पुढे आले. कोणत्याही ॲकॅडमीक स्तरावरून लोककला संवर्धनाची भाषा बोलली गेली. कलेचा दृष्टिकोन ठरविण्यात आला. अभ्यास मंडळे आणि अभ्यासनाचे संकेत मिळाले. अनुदान घेणारी संस्कृती उदयास आली. शोध आणि प्रबंधाच्या फाईली वाढल्या. परंतु परंपरा टिकविणारे कलावंत उपेक्षित राहिले. त्यांचा विचार, त्यांची बांधिलकी सन्मानाने मिरवली गेली नाही. त्यांचा विचार रुजू दिला नाही. ही खंत या संबंध चरित्र अवकाशाचा भाग आहे. केवळ संस्कृती टिकविणे हे कला संवर्धनाचे काम नाही ती वाढली पाहिजे, निरंतर त्याच प्रवाहाने काही अधिक सामावून वाहत राहिली पाहिजे.

तमासगिरांची जात/तमासगिरांचा धर्म/आणि कपाळावर कमीपणाचा शिक्का/अक्करमाशी रक्त वाहतं बदनाम जिंदगीतून/ कुळाच्या मुळपुरुषाचे कुठे नक्की नाव सांगता येते?/बोर्डावरच्या नाचावरच ठरते पाहुणपण/बोर्डावरल्या ओळखीवरच फुटते सुपारी/आणि सुरू होतो संसार/बोर्डावरल्या खणखणाटातच/चाहूल लागते नव्या पाहुण्याची/आम्हा कित्येक कलाकारांचा/ जन्म असाच झालाय/संस्कृतीच्या ठेकेदारांनी याचे/ खूप भांडवलच केले आजपर्यंत....

या सगळ्या व्यवस्थेने लादलेल्या पीळामध्येही मी काय करू म्हणजे माझ्यातील कलेचा धर्म लोकाभिमुख होईल आणि या नरकाला सोडून जगण्यासाठी आयाम मिळेल. ही कलेसाठी तिच्या उत्थानासाठीची असलेली बांधिलकी या कवितेतून पोटतिडकेने पुढे आली आहे.

या कवितेमधून येणारा विठ्ठल अगदी सहजपणे येत नाही. त्यातून उभा केलेला काळ हा महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित म्हणून पुढे येतो. तो लोकाभिमुख चळवळी आणि संताच्या प्रबोधनाचा काळ होता. समानता हा त्या आध्यात्मिक लोकशाहीचा भाग असला तरी त्या वृत्तीचे झिरपणे खालच्या सामाजिक अंगापर्यंत पोहचले नसल्याची खंत अत्यंत जीवघेण्या स्वरूपाची आहे. वंचितांसाठी कवितेचे भांडार फुटले, कळवळ्याची जाती निर्माण झाली परंतु त्यांच्यासाठीचा प्रकाश कुठेतरी उजेडाची दलाली काळोखाशी अशा स्वरूपात बंदिस्त राहिल्याने खरे प्रबोधन कोणत्या वर्गासाठी? विठ्ठलाचे कोंडाळे कोणत्या भक्ती मार्गासाठी होते हा या वेदनेचा इतिहास आहे. या सामाजिक उलाढालीतून काय मिळाले? जगण्यासाठीच्या साधनांना प्रतिष्ठा नाही आणि प्राणांतिक साधनेला बळ मिळाले नाही. उभ्या महाराष्ट्रात या कलेला विकृत अशा लैंगिकतेचे स्वरूप प्राप्त झाले. त्यातून मिळाली असेल ती एका वर्गासाठी बहिष्कृत जाणीव मिळाली. ही गोष्ट आजही नाकारता येत नाही. पायात चाळ, अंगावर नऊ वारी आणि बोर्डावरचा लखलखाट ही रोजच्या दुःखाची नवी पहाट आजही त्यांच्या जगण्यातून जाती अंताकडे गेली नाही हे आजचे वास्तव आहे. बाईपणाचे आरपार केलेले उत्खनन हा या कवितेचा मूलभूत विषय आहे. या आवाहनामध्ये एक प्रकारचा उद्रेक विठाबाईच्या अनुभवसिद्ध जीवन जाणिवेतून पदोपदी डोकावतो. सगळ्या शोषित बायांसाठी दिलेली हाक हा तिच्यातील लढाऊपणाचा अजेंडा आहे. तिच्या स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या गोष्टीचा त्याग करण्याची धमक शोषणातून

झालेल्या दुःखातून आली आहे. त्यात धर्मा-धर्मांची अंगावर चिकटलेली गुलामगिरी, दगडाच्या देवळातील गाभाऱ्यातले देवपण, कपाळावरच्या कुंकवाच्या खोट्या प्रतिष्ठा, पांढऱ्या कपाळावर टपून बसलेल्या नजरा या बद्दलचा सर्वसमावेशक असा हिशेब आपल्या कर्तृत्त्वातून त्यांना चुकवायचा आहे. त्यासाठी या दुःखाच्या गाभ्यापर्यंत त्याच्या कार्यकारणभावापर्यंत जायचे आहे. बायांच्या दुःखाचे कारण शोधायचे आहे. आता विठाबाई बोलू लागलीय... या भागातून कवितेच्या माध्यमातून विठाबाईचा उमटलेला प्रतिध्वनी म्हणजे आजच्या शोषित स्त्रियांचा प्रातिनिधिक स्वर आहे. कवीने विठाबाईचे रूपक योजून आपल्यापर्यंत पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. विठाबाईचे जीवन म्हणजे जिवंत शोषण आहे. व्यवस्थेने आपल्या पुरुषार्थाची दिलेली ग्वाही आहे. या शोषणामध्ये उच्चभ्रूंचे सामाजिक स्वास्थ शोधण्याची परंपरा अंतर्भूत आहे. त्यासाठी विशिष्ट वर्गाचा दिला जाणारा बळी या व्यवस्थेचे घातक असे तंत्र आहे.

सिमोन द बोव्हुआर या विदुषीने मांडलेले निरीक्षण या संदर्भात महत्त्वाचे आहे. पुरातन काळापासून विवाह संस्थेवर वेश्या व्यवसायाची गडद छाया पडलेली आढळून येते. पुरुष पत्नीला एकनिष्ठेची शपथ घ्यायला लावतो. त्याला स्वतःला मात्र ती पाळणे जमतेच असे नाही. चर्चच्या म्हणण्यानुसार वेश्या ही कुलीन स्त्रियांची प्रतिष्ठा अबाधित रहावी यासाठी दिलेला बळी असते. राजवाड्याची शोभा टिकवायची असेल तर जसे गटारे बांधणे आवश्यक असते, त्याप्रमाणे आपल्या लेकीबाळी सुरक्षित रहायच्या असतील तर काही मुलींना वेश्या व्यवसायात लोटणे गरजेचे होऊन बसते आणि त्यांना शूद्रातिशूद्रासारखेच वागवणे ही महत्त्वाचे असते. या कवितेच्या दृष्टीने हा दृष्टिकोन ही काही एक बाजू स्पष्टीकरणासाठी महत्त्वपूर्ण वाटते. आपल्या हितासाठी तंबु-पालाचे जग त्यांना जाणीवपूर्वक निर्माण करावे लागते. आपल्या स्वर्गासाठी एका नरकाच्या जन्माची निर्मिती, पुनर्निर्मिती सतत करावी लागते. ही या व्यवस्थेने निर्माण कलेली कडेलोटाची परिस्थिती आहे.

तंबुतल्या चांदण्या कालही गर्भाळल्या/आणि आजही गर्भाळतात/त्यांच्या अंगावर हात रोजच कुणाचा तरी/ अशातच पडते नव्या चांदण्यांची भर/आधीच्यांचा भार हलका करण्यासाठी/पोटात काटे भरुन जगण्यापेक्षा/ घुंगरांची सोबत त्यांना अधिक खात्रीची वाटते/किती दिवस सोसायचं बायांनी/हे बळजबरी जगणं?

जोपर्यंत या गुलामीच्या बेड्यांची जाणीव व्यक्ती व समष्टीला होत नाही तोपर्यंत उठावाची भाषा अशक्य आहे. आणि स्वातंत्र्याचा अर्थ कळणे दुरापास्त आहे. व्यवस्था साहजिकच व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर गदा आणत असते. त्याला विरोध करणे म्हणजे आपल्यात निर्माण झालेल्या असतेपणाचा अंकुर शोधणे होय. या दृष्टीनेही या कवितेचा विचार होणे गरजेचे आहे. ही नुसती शोषणाची व ते स्विकारण्याची कविता नाही. तिचे असणे माणसाच्या अस्तित्वाला आवाहन करून जाते. एका बंडाचा उद्घोष नव्या पिढीच्या हाती देताना ती दिसते. त्यात बायांच्या वाटांवर पसरलेल्या जाती धर्माच्या इंगळ्यांना चिरडत पुढे जाणे, राजकीय प्रक्रियेतून संसदेची सूत्रे हातात घेणे, न्याय पालिका आणि न्याय व्यवस्थेच्या पटलावर विराजमान होत आपलं निरपेक्ष विचार सूत्र पुढे ठेवत न्याय्य अशी व्यवस्था निर्माण करणे शिक्षणातून क्रांती होऊ शकते. आपल्याला ज्यांनी नाचायला भाग पाडलं त्यांना विद्वत्तेच्या भरोशावर नाचवू शकतो ही लोकहिताची, लोकशाहीवादी धारणा महत्त्वाची वाटते. या उपेक्षित तंबूला संवैधानिक मार्गाने मुख्य धारेत आणू शकतो हा आलेला आत्मविश्वास महत्त्वाचा वाटतो. या व्यवस्थेला वठणीवर आणण्याचा मार्ग संविधानातून जातो. मला वाटते असे सूचन कवीने कवितेतून साधले आहे.

●

वेदनांकित घुंगरांचे संदर्भ (कवितासंग्रह), महादेव गोरख कांबळे, कॉपर कॉईन पब्लिशिंग प्रा. लि. दिल्ली, जून २०१८, पृष्ठे- ७१